Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

| | | |
|---|---|---|
| Telephone | | |
| Office PBX | : | (0240) 2403399/400 |
| C.O.E. | : | (0240) 2403200 |
| Fax | : | (0240) 2403199/188 |
| Website | : | www.bamu.ac.in<br>http://bamua.digitaluniversity.ac |
| E-Mail | : | coe@bamu.ac.in |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त
Office : Director, Board of Examinations & Evaluation
कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२६-२७/ ९०९ दिनांक : १५.१०.२०२६

**परीक्षा शुल्क माफीबाबत अत्यंत तातडीचे पत्र**

**प्रति,**
**विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक,**
**सर्व शैक्षणिक विभाग/संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर**

विषय : अवर्षण /दुष्काळग्रस्त भागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ८५५/तांशि-४, दि. १४ ऑक्टोबर, २०२६
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/दुष्काळ-फीमाफी २०२६-२७/ई-३१५४७३६, दि. १४.१०.२०२६
३. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग यांचे पत्र क्र. विसहसं/ उशि/छत्रसंवि/स्वायत्त महा./२०२६-२७ दिनांक १५.१०.२०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मदत व पुनर्वसन विभागाने सन २०२६ च्या खरीप हंगामात Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दि. २५.०९.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर केला असून सदर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी विशेष बाब म्हणून लागू केलेल्या उपाययोजना व सवलतींमध्ये अनुक्रमांक ५ नुसार शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी या सवलतीचा समावेश आहे.

वरील संदर्भीय शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ०५ नुसार सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) लागू झाल्याने दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमधील प्रभावित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीकरिता आवश्यक अंदाजित आर्थिक भार प्रचलित शिष्यवृत्ती योजनांचे लाभार्थी व त्याव्यतिरिक्त कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेस पात्र नसणारे विद्यार्थी संख्या विचारात घेऊन आर्थिक भाराचा तपशील सादर करावयाचा आहे. त्यानुषंगाने सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये माहिती दि. १५/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजे पर्यंत समन्वय कक्षाच्या coordination.exam@bamu.ac.in ईमेल आयटीवर तात्काळ पाठविण्यात यावा.

करिता, उपरोक्तप्रमाणे नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे**

**प्रा. (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**या पत्राची पत्र माहितीस्तवः**
१. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
२. मा. कुलगुरु महोदयांचे स्वीय सहायक, प्रशासकीय इमारत, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.
३. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे स्वीय सहायक, प्रशासकीय इमारत, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.
४. कक्ष प्रमुख, सर्व संबंधित कक्ष, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.

**महाराष्ट्र शासन**
**विभागीय सह संचालक,उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग,**
**देवगिरी महाविद्यालयाजवळ रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर**

web:- www.jdheaur.org.in email:-jdhechh.sambhajinagar@gmail.com

जा.क्र./विसहसं/उशि/अनुदान-2/2026-27/ दिनांक:- 15/10/2026

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादेत**

प्रति,
**प्र-कुलगुरु,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

विषय :- अवर्षण / दुष्काळग्रस्त भागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे बाबत.

**संदर्भ** :- संचालनालयाचे पत्र उशिसं/ शिष्यवृत्ती/दुष्काळ-फीमाफी 26-27/ ई- 3154736 दिनांक 14/10/2026

उपरोक्त विषयी संदर्भीय संचालनालयाकडील पत्र व त्यासोबतचे शासन पत्राचे अवलोकन करावे.

संचालनालयाकडील संदर्भीय पत्र तसेच त्यासोबतच्या शासनात अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शासनपत्रातील मुददा क्रमांक 5 नुसार खरीप हंगामात **Trigger-1** (प्रथम कळ ) लागू झालेल्या तालुक्यांमध्ये प्रभावित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी करीता आवश्यक अंदाजित आर्थिक भार (प्रचलित शिष्यवृत्ती योजनांचे लाभार्थी व त्या व्यतिरिक्त कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेस पात्र नसणारे विद्यार्थी संख्या विचारात घेऊन आर्थिक भाराचा तपशील सादर करावयाचा आहे ) त्याअनुषंगाने यापत्रासोबत दिलेल्या **प्रपत्र-अ व प्रपत्र -ब** तक्त्यामध्ये माहिती आजच दिनांक 15/10/2026 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत प्रस्तुत कार्यालयाच्या schol.jdheaur@gmail.com या ईमेल तात्काळ सादर करावी. तसेच सदर पत्रासोबत सॉफकॉपी सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Pankaja Madhav Waghmare
Date: 15-10-2026 11:03:27
**(डॉ.पंकजा माधव वाघमारे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

सोबत :-संदर्भीय संचालनालयाच्या पत्राची प्रत व
त्यासोबतचे शासनपत्र व विहीत नमून्यातील तक्ता

प्रत :-1. मा. शिक्षण संचालक,उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-16 यांना संदर्भीय पत्राच्या अनूषंगाने माहितीस्तव सविनय सादर.
2. **कुलसचिव,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,
## ४१२ ई,बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११०१६

Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in

फोननं. ०२०/२६१२२११९

जा.क्र.: उशिसं/शिष्यवृत्ती/दुष्काळ –फीमाफी २६-२७/ई - ३१५४७३६ दि. /१०/२०२६.

**अतितात्काळ / ईमेलद्वारे**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय - अवर्षण / दुष्काळग्रस्त भागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.**

संदर्भ : शासनपत्र क्रमांक संकीर्ण-2026/प्र.क्र.855/तांशि-4, दिनांक : 14 ऑक्टोवर, 2026

उपरोक्त विषयाबाबत सोबत जोडलेल्या शासनपत्राचे अवलोकन करावे. सदर शासन पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, मदत व पुनर्वसन विभागाने सन 2026 च्या खरीप हंगामात Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दिनांक.25.09.2026 येथील शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर केला असून, सदर तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागासाठी विशेष बाब म्हणून लागू केलेल्या उपाययोजना व सवलतींमध्ये अनुक्रमांक 5 वर "शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी" या सवलतीचा समावेश आहे.

संदर्भांकित शासनपत्रातील मुद्दा क्रमांक ५ नुसार सन 2026 च्या खरीप हंगामातील Trigger 1 (प्रथम कळ) लागू झाल्याने दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमधील प्रभावित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीकरीता आवश्यक अंदाजित आर्थिक भार (प्रचलित शिष्यवृत्ती योजनांचे लाभार्थी व त्याव्यतिरिक्त कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेस पात्र नसणारे विद्यार्थीसंख्या विचारात घेऊन आर्थिक भाराचा तपशील सादर करावयाचा आहे. त्यानुषंगाने सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये माहिती **दिनांक १५/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजे पर्यंत संचालनालयाच्या** schol.dhepune@gov.in वर तात्काळ पाठविण्यात यावा. तसेच सदर पत्रासोबत सॉफ्ट कॉपी सादर करण्यात यावी.

सोबत – माहिती सादर करण्यासाठीचे विवरणपत्र जोडलेले आहेत.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 14-10-2026 20:34:56

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १६.

सन २०२६ च्या खरीप हंगामातील दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यातील प्रभावित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीकरिता आवश्यक अंदाजित आर्थिक भार

अ) प्रचलित शिष्यवृत्ती योजना लागू असणारे लाभार्थी :- रक्कम रुपयात

| अ. क्र. | विद्यापीठाचे नाव | प्रचलित शिष्यवृत्ती योजना लागू असणारे अभ्यासक्रम | प्रवेशित विद्यार्थी संख्या (शैक्षणिक वर्ष २०२६-२७) | | | | | | | | | परीक्षा शुल्काची प्रतिविद्यार्थी सरासरी रक्कम | येणारा आर्थिक भार (१२X१३) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एस.सी. | एस.टी. | ओबीसी | व्हीजे-अ/ एनटी-ब/क/ड | एसबीसी | एसईबीसी | आदुघ | खुला | एकूण विद्यार्थी | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | | कला/ वाणिज्य/ विज्ञान/ | | | | | | | | | | | | |
| २ | | विधी/ शिक्षणशास्त्र/ शारीरिक शिक्षणशास्त्र | | | | | | | | | | | | |
| ३ | | समाजकार्य अभ्यासक्रम | | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | |

टिप - शिष्यवृत्ती योजनांसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रक्कम रु. ८.०० लक्ष इतकी असली तरी सदरच्या उत्पन्न मर्यादेपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांचा देखील यामध्ये समावेश करावा.

ब) प्रचलित शिष्यवृत्ती योजनेस पात्र नसणाऱ्या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी :-

रक्कम रुपयात

| अ. क्र. | विद्यापीठाचे नाव | प्रचलित शिष्यवृत्ती योजनेस पात्र नसणारे अभ्यासक्रम | प्रवेशित विद्यार्थी संख्या (शैक्षणिक वर्ष २०२६-२७) | | | | | | | | | परीक्षा शुल्काची प्रतिविद्यार्थी सरासरी रक्कम | येणारा आर्थिक भार (अंदाजित) (१२X१३) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एस.सी. | एस.टी. | ओबीसी | व्हीजे-अ/ एनटी-ब/क/ड | एसबीसी | एसईबीसी | आदुघ | खुला | एकूण विद्यार्थी | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | | कला/ वाणिज्य/ विज्ञान/ | | | | | | | | | | | | |
| २ | | विधी/ शिक्षणशास्त्र/ शारीरिक शिक्षणशास्त्र | | | | | | | | | | | | |
| ३ | | समाजकार्य अभ्यासक्रम | | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | |

"जनहिताय सर्वदा"

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२०४०९३५. Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.८५५/तांशि-४ दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२६.

ई-मेलद्वारे

प्रति,

संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय :- अवर्षण / दुष्काळग्रस्तग्रस्त भागातील उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.**

संदर्भ : १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३

२) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. शुल्क-५२१८/प्र.क्र.४१३/मशि-२, दि. ०३.११.२०१८

३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८१/तांशि-४, दि. ०५.११.२०१८

४) शासन निर्णय, मदत व पुनर्वसन विभाग क्र. समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि.२५.०९.२०२६

महोदय,

मदत व पुनर्वसन विभागाने सन २०२६ च्या खरीप हंगामात Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर केला असून, सदर तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागासाठी विशेष बाब म्हणून लागू केलेल्या उपाययोजना व सवलतींमध्ये अनुक्रमांक ५ वर "शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी" या सवलतीचा समावेश आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

२. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये टंचाईग्रस्त भागातील गरजू विद्यार्थ्यांना विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांच्या परीक्षा फी माफीची योजना सन १९९२-९३ पासून नियमित स्वरूपात कार्यान्वित आहे. त्यानुसार यापूर्वी सन २०१८ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीत संदर्भ क्र. २ व

३ येथील शासन निर्णय / परिपत्रकान्वये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीसंदर्भात कार्यवाही करण्यात आलेली आहे.

३. सद्यस्थितीत उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थी व त्यांना राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजना, अंमलबजावणीची यंत्रणा विचारात घेता, शासनाकडून दुष्काळ / अवर्षण जाहीर झाल्यानंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तात्काळ दिलासा मिळण्यासाठी परीक्षा शुल्कात माफी देण्याची स्वतंत्र योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेऊन, खालील मुद्यांना अनुसरुन सविस्तर प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह शासनास **दोन दिवसात** सादर करावा, ही विनंती.

१. योजनेचे स्वरुप

२. योजनेची व्याप्ती, पात्रता व निकष

३. योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती

४. सदर योजनेची अंमलबजावणी करताना लाभाची द्विरुक्ती टाळण्यासाठी अभिप्राय / उपाय

५. सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger १ (प्रथम कळ) लागू झाल्याने दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमधील प्रभावित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीकरीता आवश्यक अंदाजित आर्थिक भार (प्रचलित शिष्यवृत्ती योजनांचे लाभार्थी व त्याव्यतिरिक्त कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेस पात्र नसणारे विद्यार्थीसंख्या विचारात घेऊन आर्थिक भाराचा तपशील सादर करणे आवश्यक राहील.)

आपला,

(अनिल चौरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती (तांशि-४)